८४५८/१९

जा.क्र.प्रा./प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुवि/ २६/२००[illegible]
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 29 MAR 2003

प्रति,
~~शिक्षणाधिकारी (प्राथमिक)~~,
~~जिल्हा परिषद~~
प्रशासन अधिकारी,
मनपा/नपा., प्राथमिक शिक्षण मंडळ, पिंपरी चिंचवड.

कार्यालय
४२८७
/१२/०३

विषय : सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत, माध्यम - इंग्रजी.

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक खाप्राशा- २००३/(१२५/०३)/( )/प्राशि-२, दिनांक १५.३.२००३

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या खाजगी प्राथमिक शाळांना त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

अ.क्र.	संस्थेचे नाव	शाळेचे ठिकाण	माध्यम
१.	औद्योगिक तंत्र शिक्षण संस्था, निगडी, प्राधिकरण पुणे.	निगडी, पुणे-४४.	इंग्रजी.

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण स्वतः भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झाल्यानंतरच संबंधीत संस्थांना परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

१. संबधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधीत संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारीत शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नाव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी [illegible] पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित शाळांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची [illegible] मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधीत संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु.२०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम [illegible] अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा चालविणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी मागवली आहे. त्यावर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात अर्ज करणे संस्थेस आवश्यक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एका वर्षानंतर सुरू करण्यासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टफी मुद्रांकित स्टॅम्पपेपरवर संस्था [illegible] इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा [illegible] कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही [illegible] हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व [illegible] करून घेतावा.
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची [illegible] (नाव, [illegible], [illegible], शैक्षणिक पात्रता)

स्वाक्षरीत ... शि. उ. सं.
यांची सही आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१

प्रत माहितीसाठी अग्रेषित सादर :
मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
मा. प्राथमिक शिक्षण संचालक, [illegible], पुणे-१
अध्यक्ष/सचिव, औद्योगिक तंत्र शिक्षण संस्था, [illegible] प्राधिकरण, पुणे.

Scanned with CamScanner